सकाळ



कोल्हापूर : संविधान दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात संविधानाच्या प्रास्ताविकेस अभिवादन केल्यानंतर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व अन्य.

# शिवाजी विद्यापीठात संविधान दिन

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठात संविधान दिन, शहीद दिनानिमित्ताने भारतीय संविधानकर्ते आणि वीर शहीद जवान यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन केले. मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते संविधानाची प्रास्ताविका, संविधानाची मूळ प्रत यांना अभिवादन केले.

प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन केले. २६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांसह अन्य शहीदांच्या स्मृतिप्रतिमांनाही कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन केले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस.एस. महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये उपस्थित होते.

(N

Mair

Det

Sr, No.



निगवे खालसा : शहीद संग्राम पाटील यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

# कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडून पाटील कुटुंबीयांचे सांत्वन

कोल्हापूर, ता. २९ : निगवे खालसा (ता. करवीर) येथील शहीद संग्राम पाटील यांनी देशाच्या संरक्षणासाठी प्राणांची आहुती दिली. त्यांच्या या कार्याचा शिवाजी विद्यापीठ परिवारास अभिमान आहे. त्यांच्या हौतात्म्यामुळे पाटील कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्या दुःखात विद्यापीठ परिवार सहभागी आहे, अशा शब्दांत कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पाटील कुटुंबीयांचे सांत्वन केले.



शहीद दिनाच्या संध्येला कुलगुरू डॉ. शिर्के यांनी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव यांच्यासमवेत शहीद संग्राम पाटील यांचे वडील शिवाजी रामचंद्र पाटील व कुटुंबीयांची भेट घेतली. शिवाजी विद्यापीठातर्फे शहीद लष्करी, निमलष्करी जवान आणि शहीद पोलिस यांच्या अपत्यांना सर्व शैक्षणिक सुविधा मोफत दिली आहे. आपल्या कुटुंबातील पाल्याने शिवाजी विद्यापीठ अधिविभाग अथवा संलग्न महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास त्याचा संपूर्ण शैक्षणिक खर्च शिवाजी विद्यापीठातर्फे करण्यात येईल, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

# जोंधळे कुटुंबीयांचे कुलगुरूंकडून सांत्वन

उत्तूर : हुतात्मा ऋषीकेश जोंधळे यांच्या कुटुंबातील पाल्याने शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागात अगर संलग्नित महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास त्याचा संपूर्ण शैक्षणिक खर्च विद्यापीठातर्फे करण्यात येईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी बहिरेवाडी (ता. आजरा) येथील हुतात्मा ऋषीकेश जोंधळे यांच्या घरी भेट देऊन त्यांचे वडील रामचंद्र जोंधळे व कुटुंबीयांचे सांत्वन केले. या वेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठातर्फे शहीद लष्करी, निमलष्करी जवान आणि शहीद पोलिसांच्या आपत्यांना सर्व शैक्षणिक सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगितले.

# भारतीय भक्ती परंपरा वैविध्यपूर्ण, सर्वसमावेशक : निहारिका गुप्ता

## शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : ''भारतीय भक्ती परंपरा वैशिष्ट्यपूर्ण आहे. या भक्ती परंपरांचा प्रभाव मानवी जीवन समूहावर कायम राहिला आहे. या परंपरेचे अनेक विशेष दुर्लक्षित राहिले आहेत. संशोधनाच्या भूमिकेतून पाहिल्यास भक्ती परंपरेतील अनेक नवे पैलू आपल्या हाती लागतील,'' असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील निहारिका गुप्ता यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग, नवी दिल्लीतील सहपीडियातर्फे आयोजित 'मराठी भक्ती चळवळ संशोधन व दस्तऐवजीकरण' यावरील ऑनलाईन कार्यशाळा झाली. मराठी भक्ती चळवळीचे आविष्कार आणि संशोधनाची गरज यासंबंधी गुप्ता यांनी भूमिका मांडली. 'भक्ती आणि सुफी संप्रदाय : परंपरा, वैविध्यता, आविष्कारातील वैविध्य' या संदर्भात निहारिका गुप्ता यांनी अनेक जुने संदर्भ देत मांडणी केली. सगुण-निर्गुण भक्ती परंपरा आणि संप्रदायपरत्वे त्याचे बदलते स्वरूप यांचा आढावा घेतला. तमीळ, संस्कृत भाषेतील भक्ती साहित्याचे वेगळेपण कथन केले. दक्षिण राज्यातील भक्ती परंपरा शैव, वैष्णव, लिंगायत भक्ती संप्रदायाचा असणारा परस्परसंबंध यासंबंधी विवेचन केले.

दुसऱ्या सत्रात प्रा. कार्तिक यांनी 'भक्ती परंपरा संशोधन व सद्य:स्थिती' यासंबंधी विचार मांडले. यामध्ये उत्तरेकडील संप्रदाय, मुस्लीम भक्तिसंप्रदाय आणि त्यांची साहित्य परंपराबाबत विवेचन केले. नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, दादू दयाल पंथ या संप्रदायाची वेगवेगळ्या राज्यात असणारी भक्ती परंपरा, तिची वाटचाल, उत्सव परंपरा यासंबंधी अनेक संदर्भ त्यांनी दिले. चित्र आणि शिल्पातून अनेक संप्रदायांचे ऐतिहासिक अवशेष आजही टिकून आहेत. ज्याकडे संशोधन नजरेने पाहणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी मांडले. डॉ. उत्तमकुमार यांनी सहभाग घेतला. मराठी विभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला.